ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ पुणें, बुधवार तारीख २६ फेब्रुवारी, १९५८ अंक ९

## विविध माहिती

**रशिआचें सीलोनला कर्ज**—रशिआनें सीलोनला आर्थिक मदत म्हणून १२ कोटी रुबल्सचें कर्ज देऊं केलें आहे. ह्या कर्जाचा विनियोग कांहीं निवडक विकास योजना अंमलांत आणण्यासाठी आणि नुकत्याच झालेल्या पुरांत जी हानि झाली ती भरून काढण्यासाठी करण्यांत यावयाचा आहे. कर्ज बारा वर्षांत परत करावयाचें आहे. ह्याशिवाय, रशिआनें सीलोनला तंत्रज्ञ शिकविण्याचेंहि कबूल केलें आहे.

**जपानचें प्लॅस्टिकचें रॉकेट**—उत्तर जपानमधील एका तळावरून जपानी यंत्रविशारदांनीं एक नवीन प्रकारचें रॉकेट अंतराळांत सोडलें. हें रॉकेट सर्वस्वीं प्लॅस्टिकचें बनविण्यांत आलें होतें. रॉकेटची लांबी ९ फूट होती व त्याचा वेग ध्वनीपेक्षा तिप्पट होता. रॉकेट भूपृष्ठापासून सुमारें ६,००० फूट उंच गेलें असावें, असा अंदाज आहे.

**पोस्टाचें नवें तिकीट**—भारतामधील पोलादाच्या धंद्याचा ५० वा वर्षदिन साजरा करण्यासाठी पोस्टाचें नवीन तिकीट ता. १ मार्च रोजीं काढण्यांत येणार आहे. त्याची किंमत १५ नये पैसे राहील. तिकिटावर जमशेटपूर येथील कारखान्याचा देखावा व संस्थापक जे. एन्. टाटा ह्यांची प्रतिमा, अशीं दोन दृश्यें असतील.

**जपानी एंजिनांची मागणी**—भारताच्या रेल्वे बोर्डानें एका जपानी कारखान्याकडे रुंद रुळावर चालणाऱ्या १० रेल्वे एंजिनांची मागणी नोंदविली आहे. ह्या एंजिनांसाठीं ९८ लाख रुपये द्यावे लागतील. मात्र त्यांतील २० टक्के किंमतच रोख द्यावयाची असून बाकीची किंमत १० सारख्या सहामाही हप्त्यांनीं द्यावयाची आहे.

**कोसी नदीला धरण**—नेपाळमध्यें हनुमाननगर ह्या ठिकाणीं कोसी नदीला धरण बांधण्याची योजना नियोजन समितीनें मंजूर केली आहे. कोसी नदीच्या पुरावर नियंत्रण ठेवण्यासाठीं ह्या ठिकाणीं धरण बांधणें जरूर आहे कीं नाहीं ह्याबद्दलचा वाद आतां मिटला आहे. धरणाच्या कामासाठीं १७ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे.

**सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस्‌ची देणगी**—टाटा आयर्न अँड स्टील कंपनीनें पुढील महिन्यांत आपला सुवर्णमहोत्सव साजरा करण्याचें ठरविलें आहे. ह्या प्रसंगीं कंपनीनें आपल्या जुन्या नोकरांना १२ वर्षे मुदतीचीं सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस् देणगी म्हणून देण्याचें ठरविलें. ४० वर्षें नोकरी केलेल्यांना ३०० रुपयांचीं व ३० वर्षें नोकरी केलेल्यांना २०० रुपये किंमतीचीं सर्टिफिकेटस् देण्यांत येणार आहेत.

**अणुशक्तीवरील वीज केंद्र**—अणुशक्तीच्या साह्यानें वीज उत्पन्न करणारें भारतामधील पहिलें केंद्र अहमदाबाद जवळ उभारण्यांत येण्याची शक्यता आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागांतील ह्या कारखान्यासाठी लागणारी तांत्रिक मदत व सल्ला बहुधा ब्रिटनमधील तज्ज्ञांकडून घेण्यांत येईल.

**उच्च तांत्रिक शिक्षणाची संस्था**—पश्चिम भारतांत स्थापन करण्यांत येणाऱ्या उच्च तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थेसाठी जरूर त्या इमारती बांधण्याचें काम लवकरच सुरू होणार आहे. पुरेसे अध्यापक मिळाल्यास चालू वर्षीं ह्या संस्थेंत १०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येईल.

**रोजखपाच्या मालाची आयात**—औषधासारख्या नेहमीं लागणाऱ्या वस्तूंची आयात जितकी कमी करतां येईल तितकी करण्याचें धोरण सरकारनें स्वीकारलें आहे. पण आतां ह्याहि पलीकडे जाऊन त्यांची आयात आणखी कमी करण्यांत येण्याची शक्यता नाहीं, अशी माहिती अर्थमंत्र्यांनीं लोकसभेंत सांगितली.

**गोहत्ती येथील प्राणिसंग्रहालय**—गोहत्ती येथें स्थापन करण्यांत येणाऱ्या प्राणिसंग्रहालयासाठी बांधकाम सुरू करण्यांत आलें आहे. हिंस्र पशु, मैदानी प्राणी आणि पक्षी ह्यांची सोय करण्यांत येत आहे. सर्व बांधकाम पुढील महिन्यांत पुरें होऊन एप्रिलमध्यें प्राणिसंग्रहालय पूर्ण होईल. भारताच्या निरनिराळ्या भागांतून प्राणी मिळविण्यांत येत आहेत.

**फ्रान्सकडून बोटी घेणार**—भारत फ्रान्सकडून कांहीं बोटी खरेदी करण्याचा विचार करीत आहे. फ्रान्सकडून २८ कोटी रुपयांचें जें कर्ज मिळालें आहे, त्याचा उपयोग करून फ्रान्सकडून बोटी, धरणाची यंत्रसामुग्री, रेल्वेचें साहित्य, इत्यादि अनेक प्रकारचा औद्योगिक माल घेण्याचें घाटत आहे. दुबार कर टाळण्यासाठी उभयता देशांत पत्रव्यवहार चालू आहे.

**भारताच्या रेल्वेसाठीं यान्या**—भारतामधील रेल्वेजना २७ यान्या पुरविण्याचें काम एका ब्रिटिश कारखान्याला मिळालें आहे. पुढील वर्षाच्या प्रारंभापासून यान्या पुरविण्यास सुरवात होईल. रुंद रुळावर चालणाऱ्या व वाफेच्या साह्यानें काम करणाऱ्या अशा त्या असतील. सर्व यान्यांची मिळून किंमत ३८ लाख रुपयांच्या घरांत जाईल.

**हिंदी चित्रकाराच्या कलेचें प्रदर्शन**—श्री. के. एस्. कुलकर्णी ह्या महाराष्ट्रीय चित्रकाराच्या चित्रांचें प्रदर्शन कैरो येथें भरविण्यांत आलें होतें. चित्रकलेंतील अनेक तज्ज्ञ लोकांनीं प्रदर्शनास भेट दिली. परदेशीय राजदूतांपैकी इजिप्तमधील अमेरिकन व रशिअन वकील ह्यांनींहि प्रदर्शन नजरेखालून घातलें.

**कामगारांनीं सुट्टी घेतली नाहीं**—चीनमधील हजारों कारखान्यांतील, कचेऱ्यांतील आणि दुकानांतील कामगारांनीं चीनच्या नववर्षाच्या दिवशीं सुट्टी न घेण्याचें ठरविलें आहे. राष्ट्राच्या आर्थिक पुनर्रचनेच्या कामांत एका क्षणाचाहि खंड पडूं नये म्हणून त्यांनीं सुट्टीनिमित्त आपआपल्या गांवीं जाण्यासाठी काढलेलीं रेल्वेचीं तिकिटें परत केलीं.

**रशिआ-भारत संबंधाचे कागदपत्र**—सोव्हिएट ॲकॅडेमी ऑफ सायन्सच्या प्राच्यदेश विभागानें रशिआ व भारत ह्यांच्यामधील संबंधांचे कांहीं ऐतिहासिक कागदपत्र प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. हे कागदपत्र आतांपर्यंत अज्ञात असलेले असून त्यांतील बहुतेक उभयता देशांतील १७ व्या शतकांतील संबंधांचे आहेत.

**तिकिटाचे पैसे मागाहून धाडले**—कांहीं दिवसांपूर्वीं दिल्ली येथील रेल्वेबोर्डाच्या कचेरींत एक पोस्टमन आला आणि त्यानें रेल्वेमंत्र्यांच्या नांवानें पाठविलेली रक्कम दिली. पैसे पोस्टलऑर्डरनें धाडले होते. सोबतच्या सही नसलेल्या पत्रांत पाठविणारानें कलकत्ता ते मुंबईचा प्रवास तिकिट न काढतां केल्याचें सांगितलें होतें. हा प्रवास त्यावेळीं पैसे नसल्यामुळें विनातिकिट केला, असा खुलासाहि केला होता.

**पश्चिम जर्मनीची मदत**—भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला मदत देण्यासंबंधीं पश्चिम जर्मनीच्या मंत्रिमंडळांत तात्त्विक एकमत झालें आहे. रुरकेला येथील पोलादाच्या कारखान्याची किंमत उशिरां घेण्याचें त्या सरकारनें ह्यापूर्वीच कबूल केलें आहे. त्याशिवाय आणखी मदत मिळूं शकेल किंवा काय ह्यासंबंधीं मात्र अजून खुलासा करण्यांत आलेला नाहीं.

**अमेरिकेची पोलंडला मदत**—अमेरिकेनें पोलंडला ९·८ कोटी डॉलर्स मदत देण्याच्या एका नव्या करारावर सही केली आहे. ही मदत धरून आतांपर्यंत पोलंडला अमेरिकेकडून १९·३ कोटी डॉलर्सची मदत मिळालेली आहे. रशिआच्या वर्चस्वापासून पोलंडला मुक्त करण्यासाठी ही मदत करण्यांत येत आहे, असें म्हणतात.

**पुरामुळें रेल्वेखात्याचें नुकसान**—१९५६-५७ सालांत पूर व वादळें ह्यांच्यामुळें भारतामधील रेल्वेखात्याचें ४० लाख रुपयांचें नुकसान झालें असा अंदाज करण्यांत आला आहे. थेट गाड्यांच्या वाहतुकीस १ ते २१ दिवसांपर्यंत अडथळा आला. सर्वांत अधिक नुकसान ईस्टर्न रेल्वेवर झालें. त्या नुकसानीचा आकडा १८ लाख रुपये आहे.

**अमेरिकेंतील मुलांचा धोक्याचा खेळ**—अमेरिकेंतील १४-१५ वयाचीं मुलें मोडक्या तोडक्या साहित्याच्या साह्यानें खेळांतले अग्निबाण करून उडवूं लागलीं आहेत. त्यामुळें पालक घाबरले आहेत व पोलिस चिडले आहेत. कांहीं लोक तर रशिआच्या सामर्थ्यापेक्षा ह्या धोक्याच्या खेळांनींच अमेरिकन लोकांची मनस्थिति बिघडेल असें बोलत आहेत.

**तेलाच्या उत्पादनासाठी मदत**—इजिप्तमधील तेलाचें उत्पादन वाढविण्यासाठी जपानी तंत्रज्ञांची मदत घेण्याच्या वाटाघाटी चालू आहेत. सुएझच्या पूर्वेला असलेल्या तेलाच्या खाणीसंबंधीं ही मदत घेण्यांत येईल. सध्यां इजिप्तमधील तेलाच्या खाणींतून दरसाल २५ लाख टन तेल निघतें. उत्पादन वाढल्यास इजिप्त तेल निर्यात करूं शकेल.


# अन्नाचें रहस्य



बेडेकर मसाले, लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईंतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ **सरदारगृह** ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

**मा**धवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

**'अर्थ' ग्रन्थमाला**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार

**OUR PUBLICATIONS**

1. Banks—Yesterday, Today and Tomorrow, (1952).
2. Bankers' Annual Number, (1953).
3. Banking in Maharashtra (1954).
4. Banking in Maharashtra and adjoining Region. (1957).

THE DECCAN BOOK ASSOCIATION.
THE POONA BANKERS ASSOCIATION.

# अर्थ

बुधवार, ता. २६ फेब्रुवारी, १९५८





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## उच्च तांत्रिक शिक्षण देणारी संस्था

भारताची औद्योगिक प्रगति झपाट्यानें घडवून आणण्यासाठी तांत्रिक शिक्षण घेतलेल्या कुशल लोकांची आवश्यकता आहे. हें ओळखून उच्च तांत्रिक शिक्षण देणाऱ्या चार मोठ्या संस्था स्थापन करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामीं भारत सरकारला संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या युनेस्को ह्या उपसंघटनेकडून चांगलें साह्य होत आहे. अशा प्रकारची पहिली संस्था खरगपूर येथें स्थापन करण्यांत आली आहे.' १९५२ सालापासून ह्या संस्थेला युनेस्कोकडून मदत होऊं लागलेली आहे. सध्यां ह्या संस्थेंत १,५०० विद्यार्थी शिकत आहेत. त्यांपैकीं कांहीं पदवी-पूर्वीचा आणि कांहीं पदवीनंतरचा अभ्यास करीत आहेत. अशाच प्रकारची दुसरी संस्था मुंबईपासून १६ मैलांवर असलेल्या पवई सरोवराच्या कांठीं स्थापन करण्यांत येत आहे. उत्तर मुंबईंत वरळी येथील एका इमारतींत संस्थेच्या कामाला पुढील जुलै महिन्यापासून प्रारंभ होईल. संस्थेच्या कायमच्या इमारती बांधण्यासाठी ५५० एकरांची जागा मिळविण्यांत आली आहे. ह्या जागेवर इमारती बांधण्याचें काम चालूं आहे. बहुधा सप्टेंबर महिन्यापर्यंत त्या बांधून होतील; नंतर संस्थेचें कामकाज नव्या जागीं सुरू होईल. ह्या संस्थेंत काम करण्यासाठी युनेस्कोतर्फे २१ तज्ज्ञ पुरविण्यांत येणार आहेत. त्यांपैकीं १८ रशिअन असतील. विद्यार्थ्यांना लागणारीं पाठ्यपुस्तकें भाषांतर करवून तयार करण्याची व्यवस्थाहि झाली आहे. प्रथम संस्थेंत सुमारें १५० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येईल. त्यांपैकीं १०० पदवी-पूर्व अभ्यासक्रम पार पाडतील आणि ५० पदवीनंतरचा अभ्यास-क्रम पत्करतील. संस्थेचीं सर्व अंगोपांगें सुरू झालीं म्हणजे २,००० विद्यार्थी अभ्यास करूं शकतील.

---

## कोल्हापूर येथें अल्युमिनमचा कारखाना

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत कोल्हापूर येथें अल्युमिनमचा कारखाना काढण्यांत यावा अशी मागणी मुंबई सरकारनें नियोजन-समितीकडे केली आहे. हा कारखाना काढण्यासंबंधींची मागणी जुनीच आहे. परंतु आतां ती पुरी करणें अधिक सुलभ झालें आहे. अल्युमिनम हा धातु बनविण्यासाठीं लागणारी बॉक्साइट नांवाची माती कोल्हापूरनजीक मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होऊं शकेल, ही गोष्ट ३० वर्षांपूर्वीपासून माहीत होती. कोल्हापूर संस्थान असतांना तेथील राजवटीनें राधानगरी भागाची ह्यादृष्टीनें अनेकदां तपासणी केली होती. तपासणीच्या अहवालावरून असें दिसून आलें कीं, ह्या ठिकाणीं अल्युमिनमचा कारखाना काढणें फार सोयीचें आहे. पण कारखान्यासाठी लागणारी वीज उपलब्ध नसल्यानें कल्पना फलद्रूप होऊं शकली नाहीं. आतां कोयना योजना अंमलांत येत असल्यामुळें विजेची अडचण उरणार नाहीं. कोयनेची वीजपुरठ्याची योजना १९६० अखेर पुरी होईल. ती पुरी झाल्यावर कारखान्यासाठी लागणारी ३०,००० किलोवॅट वीज पुरविणें शक्य होईल. भारत सरकारच्या विनंती-वरून एका फ्रेंच भूगर्भशास्त्रज्ञानें देशाचा दौरा केला होता. सदर तज्ज्ञाला कोल्हापूर येथील बॉक्साइटची माती उत्तम प्रतीची वाटली. ही माती सरासरी २० फूट खोलीवर आढळून येते, आणि तिचे थर ६ ते १० फूट जाडीचे आहेत. शिवाय, अल्युमिनम तयार करण्यास ज्या प्रकारची माती लागते तशीच ती असल्यानें तिचा उपयोग करून घेणें सहज शक्य आहे. महाराष्ट्रांत खनिज संपत्ति मोठ्या प्रमाणावर आढळून येत नाहीं. अर्थातच, जी कांहीं थोडीबहुत आहे. तिचा उपयोग करून घेणें महत्त्वाचें आहे. त्यादृष्टीनें कोल्हापूरचा संकल्पित कारखाना अतिशय स्वागतार्ह आहे.

---

## सर माल्कम डार्लिंग ह्यांचा उद्बोधक अहवाल

भारतांतील सहकारी चळवळीच्या कांहीं अंगांसंबंधींचा सर माल्कम डार्लिंग ह्यांचा अहवाल मार्गदर्शक होईल. त्यांनीं पंजाबांत स्वातंत्र्यपूर्वकाळीं सहकारी क्षेत्रांत केलेली कामगिरी सुप्रसिद्ध आहे व त्यांच्या मताला विशेष महत्त्व आहे. सहकारी चळवळीची घाईनें वाढ करण्यास त्यांचा विरोध आहे; प्राथमिक सोसायट्यांनीं आधीं मूळ धरलें पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. त्यांनीं भारतांत तीन महिने दौरा करून आणि प्रत्यक्ष पहाणी करून असें मत व्यक्त केलें आहे, कीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील प्रगतीचें लक्ष्य भरमसाट मोठें आहे. कर्जपुरवठ्याकडे लक्ष देतांना काटकसरीकडे दुर्लक्ष होत आहे; ज्या राज्यांत कर्जपुरवठा मुक्त हस्तानें करण्यांत आला, तेथील अपेक्षा पुऱ्या झालेल्या नाहींत. १९५४–५५ मध्यें, प्रमुख नऊ राज्यांपैकीं पांच राज्यांतील सर्व शेतकी–सोसायट्यांपैकी एक चतुर्थांश सोसायट्या तोट्यांत चालल्या. तेव्हां सोसायट्यांची नुसती संख्या वाढविण्यांत अर्थ नाहीं. सोसायट्यांचा किमान आकार वाढविल्यामुळें प्रश्न सुटणार नाहीं. कांहीं रजिस्ट्रारांनासुद्धां सहकाराचें पुरें ज्ञान नाहीं, असा सर मल्कम डार्लिंग ह्यांना अनुभव आला; खालच्या क्षेत्रांतील मंडळींची गोष्टच वेगळी!

---

## खाणकामगार हितसंवर्धन निधी

भारतामधील कोळशाच्या खाणींत काम करणाऱ्या कामगारांच्या कल्याणासाठी हितसंवर्धन निधीची स्थापना करण्यांत आलेली आहे. ह्या निधीची व्यवस्था पाहण्याचें काम एका प्रातिनिधिक कमिटीकडे सोंपविण्यांत आलेलें आहे. १९५६–५७ सालांतील ह्या निधीचा जो हिशोब प्रसिद्ध करण्यांत आलेला आहे त्यावरून असें दिसतें कीं, ह्या वर्षी खर्चापेक्षा उत्पन्न अधिक आहे. निधीची एकूण रकम २.६ कोटी रुपये आहे. त्यावरून कामगारांना निधीपासून अधिक फायदे मिळतील अशी आशा करण्यास हरकत नाहीं. निधीचा उपयोग विविध तऱ्हेनें करण्यांत येत आहे. अपघातांत मरण पावलेल्या कामगारांच्या विधवांना साह्य करणें, महारोगाविषयींच्या उपचारकेंद्रांना मदत देणें, हिंवतापाच्या सांथीविरुद्ध उपाय योजणें, इत्यादि कामें करण्यांत येत आहेत.

शिक्षण व वैद्यकीय मदत ह्याहि क्षेत्रांत निधींतून कार्य करण्यांत येत आहे. निधि खाणींकडून घेण्यांत येणारी पट्टी व सरकारी मदत ह्या रीतीनें उभारण्यांत येतो. क्षयरोग्यांना उपचार करण्यासाठी खास व्यवस्था केलेली आहे. खाणकामगारांच्या कुटुंबांना पुष्कळ सवलती दिल्या जातात. खाणी असलेल्या भागांतून कुटुंबनियोजनाचा प्रचार करण्यांत येत आहे. कोळशाच्या खाणकामगारांनाच होणाऱ्या विशेष रोगांवर निधींतून इलाज करण्यांत येत असतात. सामाजिक कार्यकर्ते कामगारांत हिंडून निरक्षर कामगारांना नाना प्रकारांनीं साह्य करीत आहेत. निधींतून चालविले जाणारे फिरते दवाखाने चांगले लोकप्रिय झाले आहेत. स्त्री–कामगारांसाठी खास स्त्री–हितसंवर्धन अधिकारी नेमण्यांत आले आहेत. ह्या स्त्रिया कामगारांच्या मुलांच्या हिताला जपतात.

## पॉवरवर चालणाऱ्या तेलघाण्यांच्या अडचणी

### अकोला येथील विदर्भ वाणिज्य मंडळाचें निवेदन

ऑइलसीड्स क्रशिंग इंडस्ट्री चौकशी कमिटीनें (१९५६) शिफारस केली होती कीं, पॉवरनें चालणाऱ्या नव्या ऑइल मिल्स स्थापण्यांत येऊं नयेत. ही शिफारस भारत सरकारनें मान्य केली होती. तेलबियांचा पुरवठा विद्यमान ऑइल मिल्सच्या संख्येच्या मानानें अपुरा असल्यानें, कित्येक मिल्स कांहीं काळ बंद रहातात.

अशा परिस्थितींतहि, गेल्या दोन वर्षांत बरेच नवे, पॉवरने चालणारे एक्स्पेलर्स बसविण्यांत आले आहेत. पहिल्या ७५।१२५ टन तेलावर एक्साइज ड्यूटी माफ ठेवल्यामुळें, लहान बेबी एक्स्पेलर्स बसवून सर्व तऱ्हेचे कर चुकविण्यांत येऊं लागले आहेत. हे बेबी एक्स्पेलर्स फॅक्टरी ॲक्टाच्या कक्षेंत येत नाहींत. अशा नव्या पॉवर एक्स्पेलर्सना लायसेन्स देण्याचें सरकारचें धोरण जुन्या उत्पादकांना मारक व सरकारी उत्पन्न बुडविणारें आहे; एक्साइज, सेल्स टॅक्स व इनकम टॅक्स हे सर्वच कर चुकविले जात आहेत. प्रत्येक नवा लायसेन्स, म्हणजे एक्साइजचें ११,००० रुपयांचें नुकसान होय! सरकारच्या एक्साइज खात्याकडे जमा होणारे आंकडे एकूण मिल्सच्या ३०% ते ४०% इतक्यांचे कडूनच मिळालेले आहेत; त्यांतहि भरपूर माहिती दिलेली नसते. कर चुकविण्याच्या प्रकारास त्यामुळें मोठाच वाव मिळतो; जुन्या, सनदशीर मार्गानें जाणाऱ्यांना अनिष्ट स्पर्धा सहन करावी लागते. १–४–१९५६ रोजीं एक्साइज ड्यूटी बसविण्यांत आली व लहान उत्पादकांना त्याची माफी देण्यांत आली, तेव्हांपासून हें अराजकत्व सुरू झालें आहे. विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सनें ह्या संबंधांत सरकारकडे दाद मागितली आहे. एक्साइजची माफी रद्द करावी, निदान एक्साइज पट्टी वसूल करून मग लहान उत्पादकांना कमाल ११,००० रु. रिफंड द्यावा, तेल–उत्पादनावर खात्याचें नियंत्रण असावें, सेल्स व परचेस टॅक्सचें एक्साइज ड्यूटींत रूपांतर करावें, इत्यादि चेंबरच्या विधायक सूचना आहेत.

महाराष्ट्र बँकेनें वेळोवेळीं दिलेलें डिव्हिडंड (करमाफ)

| वर्षे | % |
|---|---|
| १९३७ ते १९३९ | ३½ |
| १९४० ते १९४१ | ४ |
| १९४२ ते १९४३ | ४½ |
| १९४४ ते १९५५ | ५ |
| १९५६ व १९५७ (संकल्पित) | ६ |

## कूळ व शेतजमीन कायद्याचें सुबोध विवेचन*

लॉ बुलेटीन पब्लिकेशनतर्फे १९५६ च्या ऑगस्ट महिन्यांत प्रस्तुत लेखकांनीं कूळ व शेतजमीन कायद्याची पहिली आवृत्ति प्रसिद्ध केली. तिचा पुरस्कार मराठी वाचकांनीं व वृत्तपत्रांनीं चांगल्या प्रकारें केला.

१९५६ सालीं सरकारनें कसेल त्याची जमीन या तत्त्वानुसार ज्या दुरुस्त्या केल्या त्या कार्यवाहींत आणण्याचे दृष्टीनें त्यांनीं १९५७ सालांत दोन वेळां दुरुस्त्या केल्या. या दोन्ही दुरुस्त्या मिळून कायद्यांत ४० ते ५० ठिकाणीं फेरबदल झालेले आहेत. ते बदल जागोजाग कायद्यांत वाचकांना मिळाले नाहींत तर त्यांची गैरसमजूत झाली असती. म्हणून लेखकांनीं सर्व कायदा दुरुस्त्यांसह पुनः छापून काढला असून त्यांत ठिकठिकाणीं मागील आवृत्तीनंतर झालेले न्यायालयीन निर्णय व नवीन दुरुस्त्यांवरील अर्थवाहक टीपा लिहून ही नवीन आवृत्ति तयार केली आहे. १९५६ च्या आवृत्तींतील टीपांकडे जागोजाग वाचकांचें लक्ष वेधलें आहे. त्यामुळें कायद्याचें ज्ञान चांगल्याप्रकारें होण्यास मदत होईल.

कूळ व शेतजमीन कायदा हा शेतजमिनींच्या सुधराईकरितां व जमिनमालक आणि त्यांचीं कुळें यांचेमधील संबंध नियमित करण्याकरितां म्हणून अस्तित्वांत आला. परंतु या कायद्याचा गाजावाजा जो विशेष झाला तो कूळवहिवाटीच्या कलमांबाबत झाला. ह्या कायद्यावर आपलें मत व्यक्त करतांना लेखक प्रस्तावनेंत म्हणतात, "मध्यम स्थितींत जमीनमालक हा एकंदर लोकसंख्येचे मानानें २·५ टक्के असून, व त्याचेकडील क्षेत्रमान ⅓ हून कमी आहे. अशाप्रकारें शेतीचे क्षेत्रांतील लोकसंख्येचें मापन आहे. त्यावरून कूळ व शेतजमीन कायद्यानें किती लोकांचें कल्याण होऊं शकेल हें विचारवंतांनीं स्वतःच ठरवावें. कूळ व शेतजमीन कायदा यांची एकंदर रचना पाहतां त्यांत शेतमजुराचे कल्याणाचे दृष्टीनें फारसा विचार केलेला आढळून येणार नाहीं. कुळाचे दृष्टीनें कूळ व जमिनमालक यांमधील संबंधहि एकंदर शेतजमिनीचे सुधारण्याच्या दृष्टीनें नियमित केले आहेत असें दिसून येत नाहीं. सहकारी शेतकी मंडळ्या यांचे उल्लेख कायद्यांत आले आहेत, परंतु अशा मंडळ्यांची रचना व कार्य यासंबंधीं या कायद्यांत सरकारनें विचार केला असता तर तो जमीन सुधराईचे दृष्टीनें उपयुक्त ठरला असता. एकंदर मुंबई राज्यांत १९५५ मध्यें संरक्षित कुळांची संख्या १२,२४,६७५ एवढी होती. इतकेंच किंवा याहून जास्ती लोक वरील अर्जाचे कामीं जमीनमालक म्हणून गुंतलेले आहेत. कलम ३१ अ मधील अटींत कमालक्षेत्र मर्यादेची अट व प्रामाणिकपणें घरीं करावयाची अट एवढ्या दोनच अटी ठेवल्या असत्या तर, जमिनींची नवीन मांडणी जी 'कसेल त्याची जमीन' या तत्त्वावर व्हावयास पाहिजे होती, ती चांगली झाली असती."

कायद्याचीं पुस्तकें सोप्या, संबंधित लोकांना समजतील अशा भाषेंत लिहिण्यासाठी लेखक सुप्रसिद्ध आहेत; त्यांचीं इंग्रजी व मराठी पुस्तकें लोकप्रिय झालेलीं आहेत. कूळ व शेतजमीन कायद्याची ही ताजी नवी आवृत्ति आतां प्रसिद्ध होत आहे, तीहि उपयुक्त वाटेल व मार्गदर्शक ठरेल, अशी खात्री आहे.

*कूळ व शेतजमीन कायदा (कसेल त्याची जमीन, दुरुस्त नियम व १९५७ च्या दोन्ही दुरुस्त्यांसह.) लॉ बुलेटिन प्रकाशन. लेखक : श्री. वि. गाडगीळ, एम. ए., एलएल. बी., शि. सी. अभ्यंकर, बी. एस. सी., एलएल. बी. व ग. वा. पटवर्धन, बी. ए. (ऑ.), एल. एल. बी. पृ. सं. १९३. किं. ४ रु.

## साखरेच्या उत्पादनांत वाढ

### सरकारी आकड्यांचा अर्थ लावणें अशक्य !

"अर्थ" च्या ५-२-५८ च्या अंकांत ४८ पानावर "साखरेच्या उत्पादनांत वाढ" या शीर्षकाखाली कांहीं मजकूर व आंकडे दिले आहेत. हे आंकडे सरकारी आंकड्यांशीं जुळणारे नाहींत, असें एका तज्ज्ञ वाचकानें आमच्या नजरेस आणलें आहे. आंकड्यांच्या बाबतींत एक मोठा प्रश्न नेहेमीं उपस्थित होतो, आणि तो म्हणजे, सरकारी आंकडे तरी कितपत विश्वसनीय समजावयाचे ? उदाहरणार्थ, दुसऱ्या (व पहिल्या) पंचवार्षिक "योजनां" च्या प्रसिद्धिलेल्या पुस्तकांत, तसेंच "द्वितीय पंचवार्षिक योजनेबाबत मूलभूत कागदें-पत्रें" या पुस्तिकेंत साखरेच्या उत्पादनासंबंधीं माहिती देतांना एक मोठी चूक केलेली आढळते ती अशी:—

ऊंस (Sugarcane) व गूळ (Gur) (वा कच्ची साखर—raw sugar) या पदार्थांत फार मोठें अंतर आहे; तसेंच साखर (वा गूळ) उसाचे वजनाचे सुमारें १० टक्के होते ही गोष्ट सुविख्यात असतांना वरील पुस्तकांत गूळ (वा कच्ची साखर) व ऊंस या नांवांची सर-भेसळ केलेली आढळते.

वर उल्लेखिलेल्या "कागदपत्रांच्या" पृष्ठ क्र. ५३ वर 'ऊंस' या शब्दापुढें 'कच्ची साखर' हे शब्द घातले आहेत. जणू ऊंस व कच्ची साखर हे पदार्थ एकच ! या पुस्तिकेंतच नव्हे तर "दुसरी पंचवार्षिक योजना" या पुस्तिकेंतहि ऊंस व गूळ (वा कच्ची साखर) या नांवांची गल्लत केलेली आढळते.

"दुसरी पंचवार्षिक योजना" या पुस्तिकेच्या पृष्ठ २५६ वर "ऊंस (गूळ)—Sugar Cane (Gul)—असें छापलें आहे; पृष्ठ २६२ वरहि तीच चूक पुन्हां केलेली आहे. आंकडे प्रयुत म्हणजे दशलक्ष टनांत खालील प्रमाणें दिले आहेत :—

| | सन १९५५-५६ | सन १९६०-६१ |
|---|---|---|
| ऊंस (गूळ) | ५.८ | ७.१ |

१९५५-५६ म्हणजे (पहिल्या पंचवार्षिक योजनेचें अखेरचें व) दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें प्रारंभीचें साल व १९६०-६१ म्हणजे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें अखेरचें साल होय.

महत्त्वाचा प्रश्न असा कीं, वरील वजन गुळाचें (कच्च्या साखरेचें) कीं उसाचें ? उसाचें (Sugar Cane) असेल तर गूळ व साखर त्याच्या सुमारें $\frac{1}{10}$ होणार. अर्थात् ५.८ प्रयुत (दशलक्ष) टन उसापासून साखर (वा गूळ) होईल ०.५८ प्रयुत (दशलक्ष) टन ! मात्र पृष्ठ ४२२ (औद्योगिक विकास या प्रकरणांत) वर तयार झालेल्या साखर-गुळाचा आंकडा (१९५४ सालाकरितां) दिला आहे फक्त ०.२८ प्रयुत (दशलक्ष) टन ! मग तो आंकडा चूक कीं, ऊंसच (व त्यापासून अपेक्षित गूळ वा साखर) कमी झाला तें कळत नाहीं ! १९५४ सालीं १९५५-५६ सालापेक्षा उसाचें उत्पन्न कमी असणार हें लक्षांत ठेऊनहि १९५४ सालचे ०.२८ प्रयुत टन गूळ (वा साखर) हा आंकडा फार लहान वाटतो ! १९५४ सालचा आंकडा कांहीं असला व त्याचें स्पष्टीकरण कसेंहि असलें तरी, १९६०-६१ सालीं अपेक्षित साखर-गुळाचें वजन २.५ प्रयुत (दशलक्ष) टन म्हणून पृष्ठ ४२२ वर स्पष्ट लिहिलेलें आहे. तितक्या वजनाचा माल (साखर वा गूळ) तयार होण्यास लागणार २५ प्रयुत (दशलक्ष) टन ऊंस. पण त्या पानावर उसाचें अपेक्षित वजन, १९६०-६१ सालाकरितां दाखविलें आहे फक्त ७.१ प्रयुत (दशलक्ष) टन ऊंस. हा ऊंस २.५ प्रयुत (दक्षलक्ष) टन गूळ साखर होण्यास कसा काय पुरणार ? ७.१ प्रयुत टन उसापासून गूळ-साखर होईल ०.७ (फार तर १) प्रयुत दशलक्ष टन ! बरें, ७.१ हा आंकडा गुळाचा मानला व पृष्ठ ४२२ वरील २.५ हा आंकडा साखरेचा मानला, तर तेंहि जुळत नाहीं. कारण, ७.१ प्रयुत टन गुळापासून साखर होईल जवळ जवळ वजनानें तितकीच ! थोडी कमी धरली तरी ७ प्रयुत (दशलक्ष) टन ! मग ती २$\frac{1}{2}$ प्रयुत टनच कां दाखविली आहे ? वरील आंकडे गुळाचे मानले वा उसाचे मानले, तरी अनवस्था कायमच आहे !

"कागद पत्रें" व "द्वितीय पंचवार्षिक योजना" दोन्ही पुस्तकांत केलेली चूक "प्रथम पंचवार्षिक योजने" च्या पुस्तकांतहि होता; त्या पुस्तकाच्या २०८ पृष्ठावर खालील मजकूर छापला होता.

| मालाचें नांव | संख्या (दश लक्षांत) |
|---|---|
| ऊंस (Sugar Cane) | ०.७ (गूळ टन)<br>Gul Tons |

म्हणजे ०.७ प्रयुत (दशलक्ष) हें वजन उसाचें कीं, गुळाचे ? वरील चूक प्रसिद्ध केली नाहीं, नजरेस आणली गेली नाहीं, असेंहि नाहीं "Irrigation and Agriculture in the first Five Year Plan-An appraisal" या जोशी व ढेकणे यांनीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांत ती चूक दाखविलेली असतांहि पुन्हां तीच चूक "दुसरी पंचवार्षिक योजना" या पुस्तिकेंत केली जावी याचें आश्चर्य वाटतें !

मागें हरदासांनीं कथेंत सांगितलेली एक नक्कल आहे, ती अशी. एका गृहस्थास 'पांडव किती ?' म्हणून विचारलें असतां त्याला त्या प्रश्नाचें उत्तर माहिती नसल्यानें त्यानें सांगितलें कीं 'पांडव बाजेच्या खुराइतके म्हणजे तीन, व बोटें दाखविलीं १॥ ! ती हरदासी नक्कल म्हणून खोटी वाटे ! मात्र वरील आंकडे व मालाचीं नांवें वाचलीं म्हणजे वरील नक्कल खोटी वाटेनाशीं होते. पांडवांची संख्या सांगणारा इसम सध्यांच्या सरकारांतील एखादा तज्ज्ञ असावासें वाटूं लागते !!

---

## तुमचें स्थान कोणतें ?

(लेखक व प्रकाशक : श्री. श्री. वा. काळे, दुर्गाधिवास, ८२३ शिवाजीनगर, पुणें ४. पृ. १२०, मूल्य दोन रुपये.)

"सभाजांतील प्रत्येक व्यक्तीला कांहीं ना कांहीं विशिष्ट स्थान असतें. पण दुर्दैवाची गोष्ट म्हणजे असंख्य लोकांना आपलें स्थान कोणतें आहे व आपण कुठें आहोंत याची जाणीव नसते. या जाणिवेशिवाय सामाजिक व कौटुंबिक जीवनाच्या धकाधकींत संपूर्णतः यशस्वी होणें कठीण आहे.

"जीवनांतील अनेक अडचणींना तोंड देत तें सुसह्य, किंबहुना समृद्ध करण्यासाठी बुद्धिचातुर्य, व्यवहारदक्षता, गोड वागणूक, अशा लहानमोठ्या गुणांची आवश्यकता फार मोठी. रोजच्या जीवनांत, लहानसहान प्रसंगांत या गुणांची कसोटी लावण्याचे प्रसंग येत असतात व त्यावरून यशापयशाचें मोजमाप ठरत असतें. अशाच लहानसहान प्रसंगांच्या आधारें या पुस्तकांत केलेली चर्चा व त्यांत प्रकट केलेले विचार मार्गदर्शक ठरतील."

—अमृत, फेब्रुवारी १९५८.

## रेल्वे खात्याचा १९५६–५७ चा अहवाल

मागील वर्षापेक्षा या वर्षात मालवाहतुकींत ८·७७ टक्के तर उतारूंचे संख्येंत ६·५७ टक्के वाढ झाली आहे. त्याचप्रमाणें एकूण टन-मैल, उतारू-मल यांत व रेल्वेच्या कार्यक्षमतेच्या निर्देशांकांतहि वाढ झाल्याचें या अहवालावरून दिसून येतें.

देशांतील वाढता व्यापार व वाढतें उत्पादन यांस रेल्वेनींहि आपल्याकडून हातभार लावला आहे आणि गाड्यांच्या वहातुकींत मुसळधार पाऊस, महापूर इ. आपत्ती येऊनहि, अनेक दिशांनीं रेल्वेनीं प्रगति केल्याचें अहवालांत म्हटलें आहे.

### दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें पहिलें वर्ष

पुनर्विलोकनाचें हें वर्ष म्हणजे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें पहिलें वर्ष आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेंतील अखेरच्या वर्षाशीं म्हणजे १९५५–५६ शीं तुलना करतां सरकारी मालकीच्या रेल्वेवरील १९५६–५७ मधील मालवाहतुकीचें प्रमाण ११४ दशलक्ष टनांवरून १२४ दशलक्ष टनांवर जाऊन १० टक्क्यांनीं वाढलें.

या वर्षात रेल्वेखात्यानें प्रत्यक्षांत १७९·०९ कोटी रु. खर्च केला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतून रेल्वेसाठी मुक्रर केलेल्या एकूण ११२५ कोटी रु. पैकीं, १/३ रक्कम रेल्वे खात्यानेंच (घसारानिधींतून २२५ कोटी रु. व रेल्वेच्या चालू उत्पन्नांतून १५० कोटी रु.) मिळवावयाची आहे. बाकीची ७५० कोटी रु. रक्कम सर्वसाधारण महसुलांतून मिळावयाची आहे.

### माल व उतारू वाहतुकींत वाढ

या वर्षीच्या मालवाहतुकींत, मागील वर्षीच्या ११५ दशलक्ष टनांवरून १२५ दशलक्ष टनांवर आणि टन मैलांतहि ३६४७२ दशलक्षांवरून ४०२२५ दशलक्षापर्यंत वाढ होऊन एक उच्चांक प्रस्थापित झाला आहे.

उतारूवाहतुकींतहि १९५५–५६ मधील १२९७ दशलक्षांवरून १९५६–५७ मध्यें १३८३ दशलक्षांवर वाढ झाली आहे. उतारू-मैलांत ही वाढ ३९०४३ दशलक्षांवरून ४२१९४ दशलक्षांवर गेली आहे.

या वर्षात वाघिणी भरण्याचें प्रमाण दरदिवशीं ब्रॉड गेजवर सरासरी १२१६८, तर मीटर गेजवर ७८१९ असें होतें. १९५५-५६ चे हेच आंकडे अनुक्रमें ११३७४ व ७२६३ असे होते.

### उत्पन्न व खर्च

सदर वर्षात सरकारी रेल्वेंना एकूण वाहतुकीचें उत्पन्न ३४७·५७ कोटी रुपये मिळालें. त्यापैकीं उतारू वाहतुकीपासून ११६·३३ कोटी रु. व माल वाहतुकीपासून २०३·९६ कोटी रु. असून पार्सलें, लगेज व इतर किरकोळ कामें यापासून २७·२८ कोटी रुपये मिळाले.

सदर वर्षातील सर्वसाधारण चालू खर्च २३३·०४ कोटी रु. म्हणजे त्यामागील वर्षातल्या खर्चापेक्षा २०·९९ कोटी रुपयांनीं जास्त होता. राखीव घसारा निधींत ४५·६३ कोटी रुपये जमा करण्यांत आले.

सन १९५५–५६ मध्यें घसारा राखीव निधी ३० कोटी रुपयांऐवजीं वाढवून ४५ कोटी रुपये करण्यांत आला असून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत तो तसाच ठेवण्याचा विचार आहे. हा निधि धरून, झालेला खर्च भागविल्यावर सदर वर्षात निव्वळ उत्पन्न ५८·३८ कोटी रु. उरलें. त्यांतूनच १९५४ च्या दुरुस्त करारानुसार लाभांश म्हणून ३८·१६ कोटी रु. सर्वसाधारण महसुलांत जमा करण्यांत आले. सदर वर्षात २०·२२ कोटी रु. निव्वळ शिल्लक राहिली ती विकासनिधींत जमा करण्यांत आली.

माल वाहतुकीपासून मिळणारें उत्पन्न (माल चढविणें-उतरविणें, माल घेऊन जाण्यास विलंब झाल्याबद्दलचा आकार, इत्यादि किरकोळ उत्पन्न वगळून) १९६५–५६ मध्यें १७७·९२ कोटी रुपये होते, तें वाहतुकींतील वाढीमुळें १९५६–५७ मध्यें वाढून २०१·०९ कोटी रुपयांवर गेलें.

मालवाहतुकीचें दर मैलामागील सरासरी उत्पन्न १९५५–५६ मध्यें ११·१ (दुरुस्त) पै होतें, तें सदर वर्षात ११·३ पै झालें. उतारू-वाहतुकीचे दर मैलाचा हा आंकडा १९५५–५६ मध्यें होता तितकाच म्हणजे ५·३४ पै राहिला.

### भांडवल गुंतवणूक

३१ मार्च, १९५७ रोजीं भारतीय रेल्वेनीं एकूण १,२४६·४० कोटी रुपये भांडवल गुंतविलें होतें. (यामध्यें बांधकाम चालू असलेल्या मार्गांचा अंतर्भाव होतो.) यांपैकीं १,२३९·८८ कोटी रुपये सरकारी रेल्वेखात्यासाठी गुंतविण्यांत आले असून यांपैकी भांडवलांतून १०७१·७१ कोटी रुपये, घसारानिधींतून ४५·४२ कोटी रुपये, विकास फंडांतून ७५·५४ कोटी रु. आणि रेल्वेच्या महसुली उत्पन्नांतून ४३·२१ कोटी रु. उभारण्यांत आले. बाकीचे ६·५२ कोटी रुपये कंपन्या आणि जिल्हा बोर्ड यांनीं उभारले.

अहवालाच्या या वर्षात भारतांतील सर्व रेल्वेच्या लोहमार्गांची लांबी एकूण ३४,७४४ मैल होती. यांपैकीं ३४,२९१ मैलांची व्यवस्था सरकारकडे होती व उरलेल्या ४५३ मैलांची व्यवस्था बिनसरकारी यंत्रणाखालील छोट्या छोट्या रेल्वेकडे होती.

यावर्षी ११५·८९ मैल लोहमार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यांत आला. यांपैकी ९५·८२ मैलांचे नवे मार्ग होते व गेल्या महायुद्धांत काढून टाकण्यांत आलेले २०·२७ मैल लांबीचे लोहमार्ग परत टाकण्यांत आले.

या वर्षाचे अखेरीस ५६९·४५ मैल लांबीच्या लोहमार्गांचें बांधकाम चालू होतें. त्यांत खांडवा–हिंगोली मार्ग (१८७·२३ मैल), क्विलॉन अर्नाकुलम् (५९·३२ मैल), इंदूर–देवास–उज्जैनि (४९·२३ मैल), रेनिवा-भिलडी (४३·६१ मैल), इटाह–बारहान (३७·२७ मैल) आणि पोलाद कारखान्याच्या क्षेत्रांतील कांहीं लोहमार्ग, यांचा समावेश आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## मुंबई सहकारी कायद्यावरील लाड समितीचा अहवाल
( लेखांक ४ )

लेखक:—श्री. स. वा. कुलकर्णी, बी. ए., एलएल. बी.

### शैक्षणिक फंड

सहकारी चळवळीचा प्रसार वाढत्या प्रमाणांत करावयाचा झाल्यास बहुजन समाजास शिक्षणाची व त्याद्वारें प्रचाराचीं सर्व साधनें उपलब्ध करून दिलीं पाहिजेत. हीं साधनसामुग्री पुरविण्यासाठी खर्चाकरितां कांहीं विशिष्ट योजना आंखल्याशिवाय रक्कम उभी करतां येणार नाहीं. राज्यांतील सहकारी संस्थांनीं वर्गणीच्या रूपानें कांहीं निधी एकत्र केल्याखेरिज हें काम पूर्ण होणार नाहीं. मुंबई राज्य सहकारी संघाकडे राज्यांतील सहकारी संस्थांकडून निधी मिळाल्याखेरीज राज्य सहकारी संघास प्रचारकार्याचें काम करतां येणें शक्य होणार नाहीं. सहकारी संस्थांना मिळालेल्या नफ्यांतील कांहीं भाग राज्य सहकारी संघास दरसाल वर्गणीच्या रूपानें देणेबाबत पूर्वीच्या कायद्यांत उल्लेख आहे. परंतु ह्याबाबत कांहीं संस्थांचे पदाधिकारी अगर सेवक सोयीस्करपणें दुर्लक्ष करून राज्य सहकारी संघाकडे बिनचूक निधी पाठवत नाहींत; व त्याबाबत राज्य सहकारी संघासहि कांहीं उपाययोजना करणेचा हक्क अगर अधिकार ठेवलेला नव्हता. ह्याचा परिणाम शैक्षणिक फंडावर होऊन पर्यायानें प्रचारकार्यांत अडचणी निर्माण होऊं लागणेचा संभव दिसूं लागला. ही परिस्थिति टाळणेसाठी नियोजित कायद्यांत तरतूद केलेली दिसत आहे.

राज्यांतील सहकारी संस्थांना चार टक्क्यांपेक्षा जास्त नफा झालेला असल्यास अशा संस्थांनीं राज्य सहकारी संघाकडे ठरवलेल्या दराप्रमाणें शैक्षणिक निधी पाठवलाच पाहिजे. ज्या सहकारी संस्थेवर शैक्षणिक फंड पाठवणेची जबाबदारी असेल अशा संस्थेस शैक्षणिक निधी राज्य सहकारी संघास पाठवलेशिवाय सभासदांना डिव्हिडंड जाहीर करतां यावयाचे नाहीं व अशा संस्थेचे पदाधिकारी हेतुपुरस्सर वरील गोष्टींचा भंग करतील तर त्यांचेवर शैक्षणिक निधी भरणेची वैयक्तिक जबाबदारी टाकलेली आहे. सहकारी संस्थांतील पदाधिकाऱ्यांचेवर नियोजित कलमानें मोठी जबाबदारीच टाकलेली आहे. प्रतिवर्षी यावया लागणाऱ्या शैक्षणिक फंडाची रक्कम राज्य सहकारी संघाकडे सुपूर्त न केल्यास त्या संस्थेच्या जबाबदार पदाधिकाऱ्यांकडून वार्षिक निधी वसूल करून घेतां येईल. नियोजित दुरुस्त सहकारी कायद्यांत अशा स्वरूपाच्या, शासन करण्याच्या तरतुदी बरेच ठिकाणीं आढळतात. एका विशिष्ट मर्यादेपर्यंत अशा तरतुदी घालणें क्रमप्राप्त आहे. परंतु प्रत्येक वेळीं कायद्याचा बडगा दाखवून काम करून घेणें सर्वथा श्रेयस्कर आहे असें कोणीच मानणार नाहीं. सहकारी चळवळ ही लोकाभिमुख करावयाची असून लोकशाही पद्धतीनें राबवावयाची आहे; असें असतांना प्रत्येक खेपेस सहकारी कार्यकर्त्यांचे कान पकडून त्या योजना अमलांत आणावयाचें ठरवल्यास सहकारी कार्यकर्त्यांची केविलवाणी स्थिति होऊन सहकारी संस्थांना लायक मंडळी मिळणेस अडचण भासणार आहे. ज्या सहकारी कार्यकर्त्यांच्या हातून सहकारी क्षेत्रांतील प्रचंड कामें करून घ्यावयाचीं आहेत त्यांच्या डोक्यावर सदैव कायद्याची टांगती तलवार ठेवलेमुळें ह्या मंडळींना सहकारी चळवळीविषयीं प्रेम अगर निष्ठा वाटणार नाहीं आणि त्याचा अपरिहार्य परिणाम सहकारी कार्यावर होऊन लायक आणि तळमळीच्या कार्यकर्त्यांच्या अभावीं सहकारी क्षेत्र निस्तेज होत जाईल.


# दि सांगली बँक लि.
सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ७,००,००० |
| खेळतें भांडवल अदमासें | रु. | २,००,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार खुर्द, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर, मुंबई-फोर्ट व मार्केट यार्ड ( सांगली )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# दि बेळगांव बँक लिमिटेड
( शेड्यूल्ड बँक )

गेलीं १७ वर्षे सतत प्रगतिपथावर असलेली व ठेवीदारांच्या वाढत्या विश्वासास पात्र असलेली बँक.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ... | रु. १,८७,००० |
| ठेवी | ... | रु. १ कोटी १० लाखांचे वर |
| खेळतें भांडवल | ... | रु. १ कोटी ४० लाखांचे वर |

खालील वाढलेल्या दरानें ठेवी स्वीकारण्यांत येतात.

| | |
|---|---|
| १ व २ वर्षे मुदत | द. द. शें. ३ टक्के |
| ३ „ „ | „ ३॥ „ |
| ४ „ „ | „ ३॥ „ |
| ५ „ „ | „ ४ „ |
| सेव्हिंग्ज बँक | „ २ „ |
| होम सेव्हिंग्ज बँक | „ २½ „ |

याशिवाय दरमहा नियमित बचत करण्यासाठीं क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटची आकर्षक योजना गेलीं ९ वर्षे सुरू असून ती चांगलीच लोकप्रिय झालेली आहे. या योजनेंत ३८ महिन्यांनंतर व्याजासह रक्कम परत मिळते.

दरसाल दर शेंकडा ४ टक्के दराचीं पंचवार्षिक कॅश-सर्टिफिकेटसहि दिलीं जातात.

बँकेच्या मुख्य कचेरीच्या इमारतींत अद्ययावत् सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय आहे.

विशेष माहितीसाठीं समक्ष चौकशी करावी.

रविवार पेठ, बेळगांव.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें २.

**प्रगतीचा तुलनात्मक तक्ता १९४०–१९५७.**

| वर्ष | शाखा | वसूल भांडवल (लक्ष रु.) | गंगाजळी व इतर निधि (लक्ष रु.) | ठेवी (लक्ष रु.) | दिलेलीं कर्जें (लक्ष रु.) | गुंतवणूक (लक्ष रु.) | रोकड व बँकांकडील शिल्लक (लक्ष रु.) | खेळतें भांडवल (लक्ष रु.) | नक्त नफा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४० | २ | १·८१ | ·२९ | २७·५२ | १३·०५ | ११·४६ | ५·०२ | ३०·३९ | २०,००० |
| १३४५ | ९ | १२·५० | २·७० | १,२९·७५ | ६०·१९ | ६०·४७ | २५·४२ | १,५५·९० | १,७०,००० |
| १९५० | १८ | १६·०० | ४·७१ | २,३०·७४ | १,२५·१९ | ९०·०४ | ३४·७४ | २,७२·४६ | २,३०,००० |
| १९५५ | २९ | १६·०० | ७·७५ | ५,०६·३१ | २,३३·६६ | २,३८·४४ | ६१·१४ | ५,८६·४० | ३,४६,००० |
| १९५६ | ३४ | १६·०० | १०·०० | ६,२६·०८ | २,९५·९६ | २,५६·९९ | १,०९·४९ | ७,३२·५५ | ४,०१,००० |
| १९५७ | ३८ | २२·९४ | ११·५० | ७,८५·५३ | ३,७८.७६ | २,५४·८५ | १,८७·९७ | ९,२७.५६ | ४,६९,००० |

### ग्रामीण विद्यापीठाची स्थापना

उत्तर प्रदेशांतील नैनिताल जिल्ह्यांत रुद्रपुरा ह्या ठिकाणीं एक ग्रामीण विद्यापीठ स्थापन करण्याचें घाटत आहे. अमेरिकेंत लँड ग्रँट कॉलेज ह्या नांवाचें अशा प्रकारचें एक विद्यापीठ आहे. त्याच्या धर्तीवर नवीन विद्यापीठाची उभारणी करण्यांत येणार आहे. भारताच्या नियोजन समितीनें ह्या विद्यापीठाच्या स्थापनेसाठीं मंजुरी दिली असून तें १९५९ च्या जुलै महिन्यापासून सुरू होईल असा अंदाज आहे. संकल्पित विद्यापीठांत ५ कॉलेजें विद्यादानाचें कार्य करतील. तीं अशीं:– शेतकी कॉलेज, पशु-संवर्धन कॉलेज, शेतीच्या तंत्रविज्ञानाचें कॉलेज, गृहशास्त्राचें कॉलेज आणि शास्त्रीय कॉलेज. ह्या पांचाहि कॉलेजांचा कारभार एकाच यंत्रणेच्या मार्फत चालणार असून त्यामधून देण्यांत येणाऱ्या शिक्षणाच्या कार्यक्रमाचें सूत्रीकरण करण्यांत येणार आहे. सर्व कॉलेजें एकदम चालूं करणें आर्थिकदृष्ट्या अवघड असल्यानें राज्य सरकारनें प्रथम पांचांपैकीं तीनच कॉलेजें सुरू करण्याचें ठरविलें आहे. शेतकी कॉलेज, पशु संवर्धन कॉलेज आणि शेतीच्या तंत्रविज्ञानाचें कॉलेज हीं आधीं स्थापन करण्यांत येणार आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत ह्या तीन कॉलेजांवर मिळून १८० लाख रुपये खर्च करावे लागतील असा अंदाज आहे. विद्यापीठाच्या जागेची निवड करण्यासाठीं भारत सरकारनें हिंदी व अमेरिकन तज्ज्ञांची एक कमिटी नेमली होती. उत्तर प्रदेश सरकारच्या विनंतीवरून कमिटीनें तराई प्रदेशाचीहि पाहणी केली आणि अखेर रुद्रपुरा हें ठिकाण पसंत केलें. हें ठिकाण पसंत करण्यास विशेष कारण असें आहे कीं, गांवाच्या आसपास १६,००० एकर शेतजमीन मिळण्यासारखी आहे.

---

### द. सातारा जिल्हा बँकेच्या नव्या इमारतीचें उद्घाटन

द. सातारा जि. को. बँक लि., सांगली, ह्या बँकेच्या नव्या ऑफिस-इमारतीचें उद्घाटन दि. २२ रोजीं श्री. बी. वेंकटप्पय्या, एम्. ए., आय. सी. एस. (डेप्युटी गव्हर्नर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया) ह्यांच्या हस्तें झालें. श्री. गुलाबराव पाटील, बँकेचे चेअरमन, ह्यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर सांगलीच्या राजेसाहेबांचें भाषण झालें व अध्यक्षांनीं इमारतीचें उद्घाटन जाहीर करून समयोचित भाषण केलें.

**सहकारी शेतीचा प्रयोग**—डहाणूपासून ८ मैलांवर असलेल्या एका खेड्यांतील आदिवासी शेतकऱ्यांनीं सहकारी शेतीचा प्रयोग आरंभिला आहे. सात आदिवासी शेतकऱ्यांनीं आपली ३५ एकर जमीन सामुदायिक रीतीनें कसून येईल तें उत्पन्न वाटून घेण्याचें ठरविलें आहे. प्रयोग यशस्वी झाल्यास आणखीहि कांहीं शेतकरी त्यांत सामील होतील.

**पं. नेहरूंच्या चरित्राची आवृत्ति**—पंतप्रधान नेहरू ह्यांच्या चरित्राची खिशांत राहण्यासारखी एक आवृत्ति अमेरिकेंत लवकरच प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. पुस्तकाची किंमत १·९५ डॉलर्स ठेवण्यांत येईल. ह्यापूर्वी अमेरिकेंत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या चरित्रग्रंथाचीच ही आवृत्ति आहे. पण पहिल्या ग्रंथाची किंमत जास्त होती.

**बांधबंदिस्तीचीं कामें**—नगर तालुक्यांतील कर्जत व पारनेर ह्या दोन तालुक्यांतून सुमारें २,००,००० एकर जमिनीवर बांधबंदिस्तीचीं कामें सुरू करण्यांत आलीं आहेत. हे दोन तालुके दुष्काळी म्हणून प्रसिद्ध आहेत. कामांना कमी खर्च यावा म्हणून तालुक्यांतील लोकांनीं श्रमदानाची तयारी दाखविली आहे. कामासाठीं दर एकरीं ४० रुपये खर्च येईल.

**केरळमध्यें सायकलीचा कारखाना**—केरळ राज्यांत सार्वजनिक मालकीच्या विभागांत सायकली तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचें घाटत आहे. कारखान्यांतून दरसाल सुमारें २०,००० सायकली तयार होतील. कंपनीचें अधिकृत भांडवल २५ लाख रुपये असेल. राज्य सरकारनें ह्या कंपनींत १५ लाख रुपये गुंतविण्याची तरतूद केली आहे.

**अल्युमिनमचा कारखाना**—मध्य प्रदेशांत अमरकंटक ह्या ठिकाणीं एक मोठा अल्युमिनमचा कारखाना काढण्याचें घाटत आहे. ह्या ठिकाणीं अल्युमिनमसाठीं लागणारी माती सुमारें ३०० वर्षें पुरेल इतक्या मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होण्यासारखी आहे. ह्या ठिकाणचा प्रेक्षणीय ठिकाण म्हणूनहि विकास करण्यांत येणार आहे.

**पगारांतील कपात रद्द**—भारताच्या लोकसभेच्या माहितीपत्रकांत अशी माहिती देण्यांत आली आहे कीं, १९५८ च्या जानेवारीपासून दोघां सभासदांनीं आपल्या पगारांतील स्वेच्छेची कपात रद्द केली आहे. सरकारच्या काटकसरीच्या धोरणाला मदत म्हणून त्यांनीं कपात स्वीकारली होती.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.